# भारतीय जनता पक्ष

(केंद्रीय कार्यालय)
11,अशोक रोडी, नवी दिल्ली-11001
फोनः नं. 23005700, फॅक्सः 23005787

दिः 28 फेब्रुवारी,2014

**भाजपाचे राष्ट्रीय प्रवक्ते आणि खासदार श्री प्रकाश जावडेकर यांच्या द्वारे जारी केलेले प्रसिद्धिसाठीचे वक्तव्य**

1.भाजप कॉग्रेसला असे आव्हान देत आहे की भाजपाचे पंतप्रधानपदाचे उमेदवार श्री नरेंद्र मोदी यांनी पक्षाचे जे आर्थिक विजन सादर केले आहे त्याची आर्थिक रुपरेषेवर ते उघडपणे चर्चा करु शकतात. कॉग्रेस नेहमी भाषणातील चुका शोधण्यात मग्न असते, त्यांनी श्री नरेंद्र मोदी यांनी स्पष्ट रुपरेषा सांगितल्यावर कॉग्रेसची बोलती बंद झाली आहे.

त्यांनी अर्थव्यवस्थेत नवीन प्राण आणण्यासाठी अनेक विचार मांडले आहेत. गुंतवणूक आणण्यासाठी विश्वास आणि स्थिर प्रशासन हा मुख्य मंत्र आहे. सुशासनाबरोबर त्वरित निर्णय घेणे, नीतिंच्या घोषणा करण्याऐवजी नीतिंची अंमलबजावणी करणे हे अधिक महत्त्वपूर्ण आहे. विकास हे जनआंदोलन बनू शकते. पायाभूत रचनेत सार्वजनिक गुंतवणूकीच्या माध्यमातून रोजगार आणि कला कौशल्य उपलब्ध होऊ शकतात. तसेच लोकतंत्र-जनसांख्यिकी, मागणीचा फायदा उठविता येतो.

नवी दिल्लीत काल दिल्या गेलेल्या आपल्या तीन भाषणांत त्यांनी युपिए सरकारच्या विफलतेचा मुद्दा ठेवला आणि आपल्या अर्थव्यवस्थेच्या पुनर्जीवनाची दीशा सांगितली.

2.नौसेनेत 10 महिन्यात घडलेल्या 10 दुर्घटना सांगतात की, आपली नौसेना खुप खराब परिस्थितीत आहे. या खराब परिस्थितीसाठी युपिए सरकार पूर्णपणे जबाबदार आहे. कारण त्यांनी नेहमी आपली संरक्षण ताकद असलेल्या महत्त्वपूर्ण शस्त्रांची उपेक्षा केली आहे. नौसेना अध्यक्षांनी राजीनामा दिला आहे. संरक्षण मंत्र्यांनी सांगितले की नौसेनेचे अध्यक्ष सतत होणा-या दुर्घटनांमुळे त्रस्त झाले होते. खरे तर याची जबाबदारी संरक्षण मंत्र्यांनी घेतली पाहिजे. देशाची जनता पंतप्रधान आणि संरक्षण मंत्री यांना प्रश्न विचारत आहे की, जिवित व वित्त हानी आणि देशाचे नाव बदनाम झाले आहे यामुळे ते त्रस्त का नाही झाले. तथापि संरक्षण मंत्र्यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारली पाहिजे आणि आपल्या पदाचा राजीनामा दिला पाहिजे. भाजप दोन बहादूर नौसेनिक अधिका-यांच्या मृत्यूमुळे शोक व्यक्त करित आहे.

संरक्षणा संबंधी प्रकरणांची स्थायी समितीने बजेट वाटप आणि नौसेनेसाठी उपकरणांच्या खरेदीच्या वेळी आपल्या विभिन्न अहवालामध्ये नौसेनेच्या हलगर्जीपणाकडे इशारा केला होता. अनेक पाणबुड्या खुप जुन्या झाल्या आहेत आणि खराब परिस्थितीत आहेत कारण त्यांना पंचवीस वर्षापेक्षा जास्त कालावधी आधी खरेदी केले गेले होते. सरकारने नव्या स्कॉरपीन पाणबुड्या आणण्याचा निर्णय घेतला होता. स्कॉरपीन पाणबुड्यांचा कार्यक्रम विफल झाला आणि निर्धारित वेळेच्या मागे चालत आहे. इतपत की नौसेनेजवळ अनेक प्रसंगात नियमित दुरुस्ती आणि सुस्थितीत ठेवण्यासाठी पर्याप्त धनराशी नाही आहे. नुकत्याच झालेल्या 'सिंधु रत्न' दुर्घटनेत दुरुस्ती करताना जुन्या बॅट-या बदलण्यात आल्या नव्हत्या कारण ठेक्यासाठी विलंब झाला होता. यामुळे ही दुर्घटना घडली. सीएजी ने सुद्धा 2008-09 आणि 2010-11 मध्ये आपल्या अहवालात या कमजोरींनी दर्शवले होते.

**(श्री अरुण कुमार जैन)**

**कार्यालय सचीव**